Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षण

अमरदीप अशोक रामराजे,
सहाय्यक प्राध्यापक,
महात्मा गांधी विद्यामंदीर संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, नाशिक

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्य या मुलभूत गरजा आहेत असे ओळखले जाते. या गरजा भागविण्यासाठी मानवाने निसर्गाचा वापर करण्याचे ठरवले , त्याप्रमाणे निसर्गातील उपलब्ध साधनसंपत्ती यांचा वापर करु लागला पण या साधनसंपत्तीचा वापर मानव स्वार्थीपणाने करु लागला त्याचा परिणाम पर्यावरणाचा समतोल ढासळू लागला आणि सहाजीकच त्याचा परिणाम मानवाच्या जीवणावर होणे अपरिहार्य झाले. या पर्यावरणाचा ऱ्हास होणे किंवा त्याचा समतोल ढासळून निर्माण होणाऱ्या समस्या दुर होण्यासाठी समाजात पर्यावरण जागृती होणे गरजेचे आहे.

१९७२ मध्ये स्टॉकहोम येथे भरलेली परिषद म्हणजे पर्यावरण शिक्षणाचा महत्वाचा टप्पा होय. निसर्गावर प्रभूत्व प्रस्थापित करण्याची वृत्ती व पर्यावरणाचे भान ठेवून जोपर्यंत मनुष्य वागत नाही तोपर्यंत पर्यावरणाचा समतोल राखणे अशक्य आहे. त्यामुळे जागतीक स्तरावर पर्यावरण विषयक जाणीव जागृती होणे आवश्यक आहे हे लक्षात घेवून संयुक्त राष्ट्संघाने (UNO) जून १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे Human Environment या विषयावर परिषद भरवली या परिषदेत पर्यावरण विषयक एक जाहीरणामा तयार करण्यात आला. या जाहीरणाम्यात जागतीक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी मनुष्याचीच आहे असा विचार मांडण्यात आला. या जाहिरणाम्याचे वैशिष्टये म्हणजे यामध्ये पर्यावरण शिक्षणाच्या आवश्यकतेची कारणे अंतर्भुत केलेली होती.

या परिषदेचे फलीत म्हणजे संयुक्त राष्ट्संघ पर्यावरण कार्यक्रम (UNCP) या विभागाची स्थापना झाली. युनेस्कोने पर्यावरण शिक्षण प्रसार व प्रचार करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय पर्यावरण शिक्षण कार्यक्रम (IEPP) अंमलात आणला याचा प्रभाव संपूर्ण जगात पर्यावरण शिक्षणावर खूप झाला.

NCERT नवी दिल्ली यांनी प्राथमिक स्तरासाठी पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केला त्यानंतर अनेक घटक राज्यांनी NCERT च्या मदतीने पर्यावरण शिक्षणाचे विविध स्तरावर अभ्यासक्रम तयार केले. पर्यावरण शिक्षणाच्या संदर्भात १९८० हे वर्ष भारतात अनेक दृष्टींनी महत्वाचे ठरले. महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक धोरणानूसार राज्य शिक्षण मंडळाने पर्यावरण शिक्षण हा स्वतंत्र व अनिवार्य विषय म्हणून १९९९–२००० या शैक्षणिक वर्षापासून सुरु केला आहे.

महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठात पर्यावरण शिक्षण, पर्यावरणशास्त्र, पर्यावरण भूगोल, पर्यावरणीय

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

अध्ययन अशा विविध नावांनी अभ्यासक्रम सुरु आहे.

**पर्यावरण शिक्षणामागील NCERT ची ध्येयधोरणे :–**

१. नागरीकांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती निर्माण करणे .

२. नागरीकांमध्ये पर्यावरणाविषयक सकारात्मक अभिवृत्तीचा विकास करणे.

३. नागरीकांमध्ये पर्यावरणाविषयक सकारात्मक मूल्ये निर्माण करणे.

४. पर्यावरणविषयक समस्या सोडविण्यासाठी नागरीकांमध्ये आवश्यक कौशल्यांचा विकास करणे.

५. पर्यावरणाच्या संवर्धनामध्ये आणि पर्यावरणविषयक चळवळीमध्ये नागरीकांनी सक्रिय सहभाग घेणे.

६. पर्यावरणाचे आर्थिक महत्त्व, सौंदर्यमूल्य इ. चे आकलन करण्याची क्षमता नागरिकांमध्ये निर्माण करणे.

७. पर्यावरणाच्या संवर्धनामध्ये आणि पर्यावरणविषयक चळवळीमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घेणे.

**पर्यावरण शिक्षण आणि NCERT**

ज्या पध्दतीने शिक्षणाची रचना केली जाते त्यानुसार देशाची प्रतिमा, गरज तसेच समाजाची प्रतिकृती घडत असते व ती उमटत असते. १९३० मध्ये भारतीय शिक्षण व्यवस्थेत पहिल्यांदा पर्यावरणाच्या काही गोष्टींचा तत्वांचा समावेश करण्यात आला. आजही त्यातील काही गोष्टी शालेय अभ्यासक्रमात अंतर्भूत आहेत.

NCERT ने शालेय अभ्यासक्रमाचा आराखडा तयार केला यामध्ये स्थानिक पर्यावरणाला प्राधान्य देण्यात आले ते प्राथमिक अभ्यासासाठी तसेच माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागासाठी पृथ्वी संबधित पर्यावरणाशी असलेल्या बाबींचा आढावा घेण्यात आला.

**पर्यावरण शिक्षणाचे स्वरुप, वैशिष्टये, व्याप्ती :–**

पर्यावरण शिक्षण म्हणजे अशी शैक्षणिक प्रक्रिया आहे की, माणसाचे संबंध निसर्गाशी व मानवनिर्मित परिसराशी कसे आहेत तसेच लोकसंख्येचे नाते प्रदूषण स्त्रोत, जतन, अधोगती, स्थलांतर, तंत्रज्ञान यांच्याशी कसे आहे तसेच नागरी आणि ग्रामिण भागाचा संपूर्ण मानवी पर्यावरणाशी असलेला संबंध कोणता ? या सर्वच बाबींचा विचार करणारी शैक्षणिक प्रक्रिया होय.

The United Etates environmental Act (1970) (Sel.32) U.S. Office ने पर्यावरणाची कार्यात्मक व्याख्या दिलेली आहे. यामध्ये " पर्यावरण शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये समाजाच्या पर्यावरणात्मक समस्या जाणून घेतल्या आहेत. तसेच समस्या सोडवणुकीचा देखील प्रयत्न केलेला आहे यामध्ये कौशल्यांचा विकास तसेच रचनेचा अभ्यास व एकूण पर्यावरण व्यवस्थेवर इतर दुय्यम पर्यावरण व्यवस्थेच्या होणा–या

परिणामांचा अभ्यास केलेला आहे.”

पर्यावरण शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे मूल्यांचा शोध आणि पर्यावरणाच्या बाबतीत कौशल्यांचा विकास तसेच मानवाचे मानवाशी असलेले परस्परावलंबन संस्कृती आणि जैविक पर्यावरणाचा अभ्यास केलेला आहे.

पर्यावरण शिक्षणाचा हेतू प्रो. जोन स्मीथ यांनी पुढीलप्रमाणे मांडलेला आहे. पर्यावरण शिक्षण हा एक असा प्रयत्न आहे की ज्याद्वारे पर्यावरणाच्या क्षमता पुन्हा टिकविल्या जातील जेणे करुन वैयक्तिक आणि सामाजिक क्षमतांची निर्मिती होईल. हा काही फक्त शिक्षणाचा एक अभ्यास विषय नाही तर या तत्वज्ञानाचा विस्तार ज्यातून आपल्याला पर्यावरणाची ओळख होईल तसेच आपले वैयक्तिक आणि सामाजिक कल्याण साधले जाईल.

The International Union for the Conservation of Nature च्या मतानुसार पर्यावरण शिक्षण म्हणजे अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये नैसर्गिक मूल्यांची जपणूक तसेच निसर्गाविषयी माणसाच्या मनात आदर तसेच त्याच्या सभोवतालच्या सांस्कृतिक व भौतिक परिस्थितीचे ज्ञान होय.

**पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व**

१. पर्यावरण शिक्षण हे बालकांसाठी आणि प्रौढांच्या वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वाचे आहे. यामुळे वैयक्तिक हित आरोग्य तसेच अखिल मानव जातीचे हित साधले जाते.

२. यामुळे निसर्गातील भिन्न अन्न साखळीचे दर्शन घडते आणि पर्यावरणाचे संतुलन लक्षात येते.

३. यावरुन पर्यावरणाचा उपयोग कसा करावा, राहण्यासाठी पर्यावरण कसे योग्य करावे तसेच भौतिक संस्कृतीचा विकास कसा करावा हे लक्षात येते.

४. यामुळे बदलत्या पर्यावरण संतुलनाची योग्य जाणीव होते तसेच दूरगामी पर्यावरण संतुलनासाठी व मानवी जीवनाच्या कल्याणासाठी काय करता येईल याची दिशा मिळते.

५. लोकसंख्यावाढीमुळे निर्माण होणा–या समस्या व नैसर्गिक साधनसंपत्तीचे होणारे शोषण या अभ्यासातून समजून येते. प्रदूषणव इतर समस्यांवर उपाय करण्याच्या पध्दती समजून येतात. वनांचा नाश व मातीची धूप यांवर वृक्षारोपणासारखे व जलसंधारणासारखे उपाय करण्याची माहिती मिळते. स्वास्थ्यवर्धक जीवनाचे मार्ग त्यातून मिळू शकतात.

६. औद्योगिकरणाला मर्यादा न घातल्यामुळे हवा व पाणी प्रदूषण मोठया प्रमाणावर घडते आहे ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण नाही. याबाबतची माहिती व पर्यावरण –हासाच्या दुष्परिणामांची जाणीव देण्यासाठी पर्यावरण शिक्षण आवश्यक आहे.

७. निसर्गात होणारा मानवी हस्तक्षेप कमीतकमी करणे, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे कचरा व टाकाऊ पदार्थांवर प्रक्रिया करुन त्यापासून उपयुक्त वस्तू गॅस, ऊर्जा व खत निर्मिती करणे वन्य

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

जीवांचे योग्य व्यवस्थापन करणे, पर्यावरणविषयक कायदे शिथील आहेत गुणवत्ता दर्जा राखणे इत्यादी विविध गोष्टींचे ज्ञान झाल्याने व्यक्तिमत्त्वार त्याचा चांगला प्रभाव पडतो.

८. नैसर्गिक आपत्ती पर्यावरणाच्या समस्या व त्यावरील उपाय यांच्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा इंटरनेट व आधुनिक संगणकप्रणालीचा वापर करुन हवा पाणी जमीन वनस्पती पिके लोकसंख्या यांच्याबाबत योग्य ते नियोजन व व्यवस्थापन करण्याचे तंत्रज्ञान विकसित करुन त्याची माहिती सुलभपणे सर्वांना देण्यासाठी पर्यावरण शिक्षण उपयुक्त ठरते.

**पर्यावरण शिक्षणाची गरज :**

सगळयात जास्त समस्या या लोकसंख्या वाढीने सुरु होतात. पर्यावरण शिक्षणाद्वारे याची जाणीव लोकांपर्यंत पाहोचवणे आवश्यक आहे. तसेच वायु, जल भू–प्रदुषणामुळे आज सजीव सृष्टीवर मोठे आघात होत आहेत प्रदुषणामुळे पर्यावरणावर जे आघात होत आहेत ते पर्यावरण शिक्षणाच्या माध्यमातून स्पष्ट करता येतील. अंधश्रध्देने जगाकडे न बघता डोळसपणे कसे पहावे हे पर्यावरण शिक्षणाद्वारे सांगता येईल. अवृष्टी, तापमाणात वाढ, ओझोनचा क्षय, भूकंप प्रत्येक प्रकारचे प्रदूषण याचा प्रत्येक व्यक्तीला अनुभव येत आहे. या अशा आपत्ती निर्माण होवू नये यासाठी म्हणून प्रत्येक माणसाला जागृत करता येईल त्यासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज आहे.

विज्ञान, तंत्रज्ञान, नवनवीन शोध, कल्पना विचार समोर आले पण त्या सर्वांचा वापर बेजबाबदारपणे करुन चालणार नाही अगोदर पर्यावरण त्यातील घटक नंतर प्रगती याकडे लक्ष पूरवणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा विचार न करता प्रगती करणे शक्य नाहि. हि जाणीव पर्यावरण शिक्षणच करुन देवू शकते.

पर्यावरण शिक्षणाची गरज →

१. सर्व प्रकारची प्रदुषणे टाळण्यासाठी
२. पर्यावरण जाणीव जागृतीसाठी
३. ऑक्सीजनचे प्रमाण वाढविण्यासाठी
४. नैसर्गिक साधन संपत्तीचा जपून वापर करण्यासाठी
५. नैसर्गिक आपत्तीचे परिणाम समजून घेण्यासाठी
६. सृष्टीचा समतोल राखण्यासाठी
७. पर्यावरण समतोल साधणे हे शक्य आहे हे सांगण्यासाठी

**पर्यावरण शिक्षणात शिक्षकाची भूमिका**

१. पर्यावरण शिक्षण देणारा शिक्षक मार्गदर्शक, संघटक मित्र असावा त्याची वृत्ती सामाजिक असावी.

२. पर्यावरण शिक्षणाची संकल्पना, उद्दिष्टे, पध्दती यांचे सखोल ज्ञान त्यांना असावे.

३. ज्या वातारणात, परिसरात काम करावयाचे त्याची शिक्षकाला पूर्ण कल्पना असावी.

४. सर्व लोकांना शिक्षण देणे त्यांचे सामाजिक प्रश्न विचारात घेणे सामाजिक जबाबदारी यासंबंधी लोकांना जागृत करणे ही पर्यावरण शिक्षण देणा—या शिक्षकाची भूमिका आहे.

५. पर्यावरण असंतूलनाचे दुष्परिणाम समजावून देणे.

६. प्रदुषण टाळता येणे व संतूलन राखणे शक्य आहे हे सांगणे.

७. पर्यावरणाचा —हास थांबविण्यासाठी उपक्रमाची आखणी करणे.

८. नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने उपयोग करण्याची क्षमता वाढविण्यासाठी क्षमता वाढविणे.

९. पर्यावरण समस्यांची जाण निर्माण करणे.

१०. नैसर्गिक पर्यावरणातील घटकाच्या उपयुक्ततेविषयी जाणीव सर्वांना करुण देणे व जागरुक राहून पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला सतत उत्तेजन देणे.

**संदर्भ सूची :**

१. डॉ. प्रकाश सावंत ( २०१०) पर्यावरण शिक्षण. फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. डॉ. किशोर चव्हाण प्रा.शोभा आहेर ( २००८) पर्यावरण शिक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन. इनसाईट पब्लिकेशनस्, नाशिक

३. पर्यावरण शिक्षण, शिक्षक हस्तपुस्तिका, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

४. https://en.wikipedia.org/wiki/Environmental_education